दि. 1/08/2022

# सूचना

संभाजीराव केंद्रे महाविद्यालय जळकोट येथील CDC च्या सर्व पदाधिकारी यांना कळविण्यात येते की, दि. 3/8/2022 रोज बुधवार या दिवशी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. टी. लहाने यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन केले आहे.

तरी सर्व पदाधिकारी, कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य करावे.

स्थान : प्राचार्य कक्ष.
वेळ : 3:00 वा.
विषय :
1) वेळापत्रक
2) अभ्यासक्रम
3) तासिका

Dr. B. T. Lahane
PRINCIPAL
Sambhajirao Kendre
Mahavidyalya, Jalkot

| | | | |
|---|---|---|---|
| 01 | Dr. Kendre B. M. | President | |
| 02 | Sau. Nagargoje R. S. | Secretary | |
| 03 | Dr. Kendre T. E. | Mem. Princi. Nom. | |
| 04 | Dr. Munde A. S. | Member. Prof | |
| 05 | Dr. Rathod B. S. | Member. Prof | |
| 06 | Dr. Somwanshi A. B. | —— " —— | |
| 07 | Shri Kendre A. T. | Member. Non Tea | |
| 08 | Shri. Deshmukh A. L. | Mem. Education | |
| 09 | Shri. Kendre M. S. | Mem. Social Ser. | |
| 10 | Shri. Madne B. B. | Mem. Research | |
| 11 | Sow. Kendre A. R. | Mem. mem. Ind. | |
| 12 | Dr. Kudkekar N. P. | Mem. IQAC | |
| | | | |

| | | |
|---|---|---|
| 13 | Shri. Bhange M.B. | Mem. Secretary student Co. |
| 14 | Shri. Musale N.P. | Mem. Student Co. |
| 15 | Dr. Lahane B.T. | Principal Mem secretary |
| | | |

Shri Printers Page No.

# बैठक वृतांत

संभाजीराव केंद्रे महाविद्यालय जळकोट, CDC समितीची बैठक प्राचार्य डॉ. बी. टी. लहाने सरांच्या अध्यक्षतेखाली दि. 3/08/2022 रोजी प्राचार्य कक्षामध्ये संपन्न झाली.

बैठकीच्या सुरूवातीला प्राचार्यांनी समितीच्या बैठकीचे प्रयोजन स्पष्ट केले. या बैठकीस प्राचार्यांसह सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

शैक्षणिक वर्ष 2022-23 या वर्षामध्ये CDC मार्फत खालील ठराव पास करण्यात आले.

विषय :- 1 - वेळापत्रक

ठराव क्र. 1 - सदरील बैठकीमध्ये सन 2022-23 करीता सुधारित वेळापत्रकाची सूचना श्री देशमुख ए. एल. यांनी केली. त्यानुसार बैठकीमध्ये महाविद्यालयामधील वेळापत्रक समितीचे प्रमुख डॉ. एन. पी. कुडकेकर सर यांनी नवीन सुधारित वेळापत्रक बैठकीसमोर ठेवले. यावर साधक बाधक चर्चा होऊन सुधारित वेळापत्रकास मंजुरी देण्यात आली. तसेच वेळापत्रकाचे तीन ठिकाणी सूचनाफलकावर लावण्याचे व वर्गावर सुचना देण्याचे ठरले.

सुचक - श्री. देशमुख ए. एल.
अनुमोदक - डॉ. कुडकेकर एन. पी.

विषय क्र. 2 - अभ्यासक्रम

ठराव क्र. 2 - सदरील बैठकीमध्ये सन 2022-23 करीता विद्यापीठाने दिलेला अभ्यासक्रम वेळेत पूर्ण करण्याची सूचना श्री मद्दे बी. बी. यांनी केली. त्यानुसार बैठकीमध्ये डॉ. केंद्रे

टी. ई. यांनी अभ्यासक्रम वेळेत पूर्ण करण्यासाठी साधक बाधक चर्चा केली व वेळापत्रकाप्रमाणे अभ्यासक्रम पूर्ण करण्यास मंजुरी देण्यात आली.

सुचक : श्री मद्दे बी. बी.

अनुमोदक : डॉ. टी. ई. केंद्रे

विषय क्र. ३ तासिका.

ठराव क्रमांक ३. सदरील बैठकीमध्ये तिन्ही शाखेच्या तासिका वेळापत्रकाप्रमाणे घेण्याची सूचना श्री केंद्रे एम. एस. यांनी केली. त्यानुसार बैठकीमध्ये सौ. नागरगोजे आर. एस. यांनी महाविद्यालयातील सर्व वर्गाचे निकाल लागल्यामुळे सर्व तासिका सुरू करण्याबाबत साधक बाधक चर्चा झाली. व नव्या सूचना विद्यार्थ्यांच्या ग्रुपवर टाकण्यास सांगितल्या. या विषयाला मंजूरी देण्यात आली. व सूचना दिल्या.

सुचक : श्री केंद्रे एम. एस.

अनुमोदक : सौ. नागरगोजे आर. एस.

शेवटी प्रा. डॉ. सोमवंशी ए. बी. यांनी सर्वांचे आभार मानले.

Dr. B. T. Lahane
PRINCIPAL
Sambhajirao Kendre
Mahavidyalya, Jalkot

Printers
Page No.

सूचना

दि. 1/12/2022

संभाजीराव केंद्रे महाविद्यालय जळकोट, येथील CDC च्या सर्व पदाधिकारी यांना कळविण्यात येते की, दि. 3/12/2022 रोज शनिवार या दिवशी संस्थेचे अध्यक्ष मा. डॉ. बी. एम. केंद्रे यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन केले आहे.

तरी सर्व पदाधिकारी, कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य करावे.

ठिकाण : रू. नंबर - 18
वेळ : 3:00 वाजता.

विषय :

1) नॅक पुनर्मुल्यांकन तयारी पुर्ण करणे.
2) मुख्य इमारतीची ऑडीट नुसार दुरुस्ती करणे
3) ग्रंथालय विभागात आवश्यक, गरजेनुसार नवीन संगणक विकत घेणे, त्यासाठी निविदा मागविणे.
4) क्रीडा विभागात आवश्यक साहित्याची खरेदी करणे, त्यासाठी निविदा मागविणे.
5) मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणारे विषय.

Dr. B. T. Lahane
PRINCIPAL
Sambhajirao Kendre
Mahavidyalya, Jalkot

महाविद्यालय ...कोट जि. लातूर



## बैठक वृतांत

संभाजीराव केंद्रे महाविद्यालय जळकोट, CDC समितीची बैठक संस्थेचे अध्यक्ष मा. डॉ. बी. एम. केंद्रे साहेबांच्या अध्यक्षतेखाली दि. 3।12।2022 रोजी रु. नंबर 18 मध्ये पार पडली.

बैठकीच्या सुरूवातीला प्राचार्यांनी समितीच्या बैठकीचे प्रयोजन स्पष्ट केले. या बैठकीस प्राचार्यांसह सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

शैक्षणिक वर्ष 2022-23 या वर्षामध्ये CDC मार्फत ठराव पास करण्यात आले.

विषय 1 नॅक पुनर्मुल्यांकन तयारी पुर्ण करणे

ठराव क्र. 1 सदरील बैठकीमध्ये सन 2022-23 मध्ये नॅक पुनर्मुल्यांकनाची तयारी करण्याची सूचना श्री केंद्रे एम. एस. यांनी केली. त्यानुसार बैठकीमध्ये प्राचार्य डॉ. बी. टी. लहाने सर यांनी नॅक पुनर्मुल्यांकन करणे गरजेचे आहे असे सांगितले व यावर साधक - बाधक चर्चा होऊन तयारीसाठी मंजुरी देण्यात आली.

सूचक - श्री. केंद्रे एम. एस.
अनुमोदक - प्राचार्य डॉ. बी. टी. लहाने.

विषय क्र. 2 मुख्य इमारतीची ऑडीट नुसार दुरूस्ती करणे.

ठराव क्र. 2 मुख्य इमारतीची दुरूस्ती सदरील बैठकीमध्ये ऑडीट नुसार इमारतीची दुरूस्ती करण्याची सूचना सौ. नागरगोजे आर. एस. यांनी केली. त्यानुसार बैठकीमध्ये डॉ. टी. ई. केंद्रे यांनी मुख्य इमारतीची दुरूस्ती हा मुद्दा बैठकीसमोर ठेवला यावर साधक बाधक चर्चा झाली व तशा सूचना संबंधीतांना देण्यात आल्या.

विषय क्र. ३ ग्रंथालय विभागात आवश्यक गरजेनुसार नवीन संगणक विकत घेणे, त्यासाठी निविदा मागविणे.

ठराव क्र. ३ सदरील बैठकीमध्ये सन २०२२-२३ करीता नवीन संगणक विकत घेण्यासाठी निविदा मागविण्याची सूचना डॉ. बी. टी. लहाने सर यांनी केली. व हा विषय बैठकीत ठेवला यावर श्री केंद्रे ए. टी. यांनी अनुमोदन दिले चर्चा झाली व नवीन संगणक विकत घेण्यासंदर्भात सूचना देण्यात आल्या.

सूचक- प्राचार्य बी. टी. लहाने सर

अनुमोदक- श्री केंद्रे ए. टी.

विषय क्र. ४ क्रीडा विभागात आवश्यक साहित्याची खरेदी करणे, त्यासाठी निविदा मागविणे

ठराव क्र. ४ सदरील बैठकीमध्ये सन २०२२-२३ करीता क्रीडा विभागात आवश्यक साहित्याची खरेदी करण्यासाठीच्या सूचना श्री देशमुख ए. एल. यांनी केली. त्यानुसार बैठकीमध्ये डॉ. केंद्रे टी. ई. यांनी हा मुद्दा ठेवला यावर साधक-बाधक चर्चा झाली. व संबंधित क्रीडा निर्देशक यांना निविदा मागविण्याच्या सूचना देण्यात आल्या.

सूचक- श्री देशमुख ए. एल.

अनुमोदक - डॉ. केंद्रे टी. ई.

मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळे कोणताही विषय आला नसल्यामुळे बैठक संपन्न झाली.

शेवटी डॉ. राठोड बी. एस. यांनी आभार मानले.

Dr. B.T.Lahane
PRINCIPAL